Impact Factor – 6.625 Special Issue - 225 Feb. 2020 ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

International Multidisciplinary E-research Journal

# Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy

Organized by
Political Science Department
**Women's College of Arts & Commerce**
310 B, New Nandanvan, Nagpur - 440 009



■ EXECUTIVE EDITOR ■
**Dr. Sampada S. Kullarwar**
■ ASSOCIATE EDITOR ■
**Dr. Sandip Tundurwar** ■ **Dr. Santosh Dakhare** ■ **Dr. Anjali Gaidhane**
■ CHIEF EDITOR ■
**Dr. Dhanraj T. Dhangar**

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To :** www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

# ONE DAY NATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE

Organized by
**Political Science Department**
**Women's College of Arts & Commerce**
**310 B, New Nandanvan, Nagpur - 440 009**

On

## Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy

**8th February, 2020**

**EDITORIAL BOARD**
***( only for this issue )***

EXECUTIVE EDITOR
**Dr. Sampada S. Kullarwar**
Vice Principal & HOD Political Science Department, Women's College of Arts & Commerce, Nagpur

ASSOCIATE EDITOR
**Dr. Sandip Tundurwar**
HOD Political Science Department, Shri Binzani City College, Nagpur
**Dr. Santosh Dakhare**
HOD Political Science Department, R V Arts & Commerce College, Bhamragad, Gadchiroli
**Dr. Anjali Gaidhane**
HOD Political Science Department, Hislop College, Nagpur

CHIEF EDITOR
**Dr. Dhanraj T. Dhangar**
MGV'S Arts, Sci & Comm College, Yeola, Dist. Nashik.

**EDITORIAL POLICIES**-Views expressed in the papers/ articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

**ISSN : 2348-7143**
**Feb. 2020**

| | | |
|---|---|---|
| 18. | **Judicial Activism in Indian Democracy**<br>Dr. Ashwini Thakre | 52 |
| 19. | **Indian Democracy and Its Role of Legislature and Judiciary in Present India**<br>Bhagwan Dhote | 55 |
| 20. | **Judiciary – Democracy's Third Pillar**<br>Prof. Chaturdas J. Telang, Prof. Anand C. Wele | 57 |
| 21. | **Activeness of Judiciary in Indian Democracy**<br>Dr Shriniwas Bhong | 58 |
| 22. | **Indian Judiciary And Democracy**<br>Asst. Pro. Manoj K. Sarode, Dr. Sharada Mahajan | 60 |
| 23. | **Reflection of Violation of Democratic Values in Mahasweta Devi's Selective fiction**<br>Prof. M. B. Shamkure, Amit Madhukar Titare | 62 |
| 24. | **Judicial Activism in Indian Democracy : Causes, Necessity and Critical Evaluation**<br>Prof. Raju Pandurang Lipte | 66 |
| 25. | **Role of Indian Judiciary in Constitutional Democracy**<br>Dr. H. T. Kurkute | 68 |
| 26. | **Issue of Liberalization and Perspective of Judiciary**<br>Shraddha G. Agrawal | 71 |
| 27. | **Issue of Liberalization and Perspective of Judiciary**<br>Dr. Amita D. Raghatate | 74 |
| 28. | **Concepts of Territoriality, State and Nation**<br>Dr. Kailas V. Nikhade | 76 |
| २९. | **प्रजातंत्र और निष्पक्ष न्याय व्यवस्था**<br>डॉ. शुभ्रा मिश्रा | ७७ |
| ३०. | **भारतीय शासन व्यवस्था में न्यायपालिका के समक्ष चुनौतियाँ**<br>प्रा. अल्पना वैद्य | ७९ |
| ३१. | **भारत के लोकतंत्र में न्यायपालिका कि सक्रीयता**<br>डॉ. अर्चना ज्ञा. पाटील, | ८१ |
| ३२. | **भारत के लोकतंत्र में न्यायपालिका की सक्रियता**<br>एच.पी.पारधी, | ८४ |
| ३३. | **भारतीय लोकशाही आणि सक्रीय न्यायपालिका**<br>डॉ. संपदा एस. कुल्लरवार | ८६ |
| ३४. | **भारतीय लोकशाहीतील न्यायीक सक्रीयता : संदर्भ आणि चिंतन**<br>संदीप तुंडूरवार, डॉ. राहूल बावगे, | ९० |
| ३५. | **न्यायालयीन सक्रीयता आणि लोकशाही**<br>प्रा. डॉ. कल्पना आर. टेकाडे | ९५ |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625
Special Issue 225 : Role of Judiciary in Reinforcing Indian Democracy
ISSN : 2348-7143
Feb. 2020

# भारतीय लोकशाहीतील न्यायीक सक्रीयता : संदर्भ आणि चिंतन

संदीप तुंडूरवार,
विभागप्रमुख राज्यशास्त्र,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

डॉ. राहूल बावगे,
विभागप्रमुख राज्यशास्त्र,
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

**सारांश –**

ग्रीकांच्या लौकशाहीचे अप्रुप विद्यमान जगातल्या लोकशाही देशांना आणि नवतरूणांना भुरळ घालताना दिसते. दस्ताऐवजाच्या स्वरूपात जींवत राहिलेली लोकशाही व्यवस्था तत्कालीन मानवाच्या सभ्य जीवनाची ग्वाही देणारी आहे तसेच अनेक समर्थकाचे व त्यांच्या पाठिराख्यांचे मत आहे. ही लोकशाही नेमकी कशी विकसीत झाली याचे सुस्पष्ट वर्णन नसले तरी तत्कालीन अभिनियत समुदयात त्या विषयीची प्रिती, आस्था व बव्हंशी प्रमाणात श्रध्दादर्शक बनलेली होती. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या मांडणीत ती विषयीची विस्तृतता आढळून येते. प्लेटो चा गुरू सॉक्रेटिसने राज्यनिर्मीतीच्या कुठल्याच प्रमेयात न अडकता समुदयाचे कल्याण, तिची स्वतंत्रता जोपासल्या जाणारी व्यवस्था असावी याचे ठामपणे समर्थन केले. सॉक्रिटिसचा विचार तत्कालीन राज्यकर्त्यांना पचला नाही व त्याची परिणती ज्युरीने बहुमताने दिलेल्या प्राणांतिक शिक्षेने पूर्णझाली. लोकशाही विषयीची प्रचंड आस्था व आदर दाखविणारी नवपिढी वा विचारक तत्कालीन लोकशाहीने व न्यायव्यवस्थेने साक्रिटिसच्या घेतलेल्या बळीकडे मात्र दुर्लक्ष करून लोकशाहीचे जन्मस्थान म्हणून त्याचा गौरव करतांना दिसतात. तत्कालीन व्यवस्थेतील शासनप्रकार खरोखरच लोकशाहीचा होता की तो अभिजनशाही (ऑलिगार्की) होता याचा तौलनिक धांडोळा घेताना दिसत नाही व येथेच लोकशाही असण्याबाबतचा घोळ उद्‌भवतो.

वस्तुतः सॉक्रिटिसचा खून करण्यात आला त्यावेळी प्रभावी वक्तृत्व असणारा पेरिक्लिस सत्तेवर आहे व तो जनसमर्थनाच्या आधारावर महाजनशाहीचा विमोड करून सत्ताधिश बनला. त्याचे नेतृत्व तत्कालीन स्थितीत सर्वमान्य झाले होते. याचे कारण अथेन्सच्या नेतृत्वात काथिनस व इराणी समुदायांचा पराभव करून अथेन्सने ग्रीक राज्याचे संरक्षण केलेत. हा कालखंड इ.स. पूर्व ३७९ चा आहे. एखादे नेतृत्व जेव्हा विरोधकांना परास्त करून आपले प्रभुत्व निर्माण करते त्यावेळी कळत-नकळत त्यांच्या ठायी अहंकार व आपल्या प्रतिपक्षाला संपविण्याचा प्रयत्न करतात व या नेमक्या प्रसंगात स्विकारलेल्या शासनप्रकाराची जागा नेमक्या कोणत्या प्रकारात रूपांतरीत होत जाते. याचे भान सुटायला लागते. विदयमान जगतात पुतीनचा रशिया हे याचे मूर्तीमंत उदाहरण होय तर याच प्रवृत्तीच्या आकर्षणाला बळी पडत जाणारी अमेरिका व आपल्या बाजूच्या भवताल हे त्याचे प्रतिविष होय. अडीचहजार वर्षापूर्वीची स्थिती जणू काही त्या वळणावर येउन उभी झालीय असा भास होतोय. लोकशाही मार्गाने नव्हे त्यावर प्रचंड विश्वास, श्रध्दा असल्याचा देखावा निर्माण करणारी जी समकालीन व्यक्तीत्व आहेत ती पेरिकेलीस सारखीच प्रभावी वक्तृत्वशैली असणारी आहेत दुसरे म्हणजे प्रतिपक्ष आपले वैभव नष्ट करण्याचा प्रयत्न करणारी असून ती राष्ट्राला घातक आहेस हा विचार पेरणारी आहे. तिसरे म्हणजे विभिन्न संस्थाचा वापर आपली मांड घप्प करण्याच्या दृष्टिने प्रयत्नरत असणारी आहेत. सॉक्रेटिसच्या काळातील स्थिती लक्षात घेतली तर न्यायव्यवस्थाच बटिक झाल्याचे दिसून येते. पाचशे ज्युरीमधील केवळ दोनशे एकविस ज्युरी साक्रेटिसच्या बाजूने राहिलेत तर उर्वरितांनी तत्कालीन शासनाची री ओढत निर्णय दिला. ज्युरी किती भ्रष्ट आहेत याची चर्चा प्लेटो करतो. याचा अर्थ तत्कालीन सभ्यव्यवस्थेत न्याय विकल्या जात होता, त्याची खरेदी-विक्री व्हायची हा संदर्भ लक्षात घेतला तर विदयमान जगात आपण वावरत आहोत याचा भास व्हायला लागतो. खर तर न्यायव्यवस्था लोकशाहीची बूज राखणारी व त्याचे सवंर्धन करणारी एक प्रभावी यंत्रणा मागल्या जाते हे आजचे वर्तमान असले तरी लोकशाहीचे रोपटे ज्या ग्रीकांनी लावले त्यांना ती मान्य होणारी बाब निश्चितच राहायला हवी होती. या पार्श्वभूमीवर प्लेटो 'क्रिटो' मध्ये म्हणतो. न्यायप्रक्रीयेमधून विवेक हरवला की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. लोकांची वृत्ती नेमकी याबाबत कशी आहे? "The ordinary public, who put people to death, and would bring them back to life if they could with equal indifference to reason" विवेकाला सोडचिठ्ठी दिलेल्या स्वतःच्या समाजाच्या ठायी पुन्हा एकवार विवेकाची स्थापना कशी करावयाची, फ्रेडलँडर याबाबत पूढे म्हणतो "The nature of the logos requires that if be valid independent of the circumstances"[१] (वसंत पळशीकर, १९९८) ज्या अथेन्सनच्या लोकशाहीतील न्यायव्यवस्थेने सॉक्रेटिसचा खून करून प्रश्नकर्त्यांचा आवाज बंद केला त्याच्या परंपरेतील प्लेटो व ॲरिस्टॉटला परागंदा होउन अत्यंत बकाल अवस्थेत जीवन कंठावे लागले. त्या लोकशाहीप्रतीचे वास्तव समजून घेतानाच विदयमान जगातील प्रारूप समरूप असल्याची जाणिव करून देत असेल तर निरपेक्ष लोकशाही अथवा तीला पोषीत करणारा विवेकवादी समाज विकसीत झालेला दिसून येत असल्याचे परिक्षण महत्वाचे ठरते. केवळ लोकशाही व ती टिकवून धरण्याकरीता आवश्यक असणाऱ्या यंत्रणा अथवा संस्था उभ्या करून शासनप्रकार अस्तित्वात येउ शकत नाही तर तिला पोषक समाजमन तयार होण्याची नितांतता आहे. केवळ शाब्दिक स्वरूपात तिचे अस्तित्व असून चालत नाही, तर व्यक्तीला ती जीवंत स्वरूपात कार्यरत आहे हा विश्वास पटण्याची गरज आहे. तत्कालीन व्यवस्थेत आजच्या प्रारूपांचे घटनात्मक शासन अस्तीत्वात होते असे

ॲरिस्टाटल आपल्या तौलनिक अभ्यासात मांडतो मग घटनात्मक व्यवस्था आल्याने शासन निरोगी लोकशाही राबविते का? अथवा तसा ती प्रयत्न करते का? तर याचे उत्तर समाधानाच्या पातळीवर आनंद देणारे नाही. तत्कालीन ग्रीकांच्या व्यवस्थेतील ज्युरी जसे स्खलनशिल होते, अथवा राज्य आश्रयदाते, अनुनयवादी व लाभाची अपेक्षा राखणारे होते. त्याचे प्रतिबिंब आजही कायम आहे. जनतेला जेव्हा 'न्याय विकत घेता येतो' (मुठभर व्यक्तीच्या दृष्टिने का होईना) असे वाटू लागते त्यावेळी अनेकानेक प्रश्न उपस्थित होउ लागतात व सामान्य जनता त्याच दृष्टिने विचार करू लागते. वस्तुत: जगातल्या कुठल्याच सामान्य नागरिकांना लोकशाही शिवाय दुसरा शासनप्रकार मान्य नाही. मात्र धनाढय, प्रभावी व्यक्ती जेव्हा आपल्या प्रभावाचा वापर करून लोकशाहीला बटीक बनवतात तेव्हा मात्र त्यांचा या शासनप्रकाराविषयी कडेकोट झालेला असतो. सध्याच्या वातावरणातील हे वास्तव्य पाहू जाता ग्रीकांच्या लोकशाहीला व न्यायरचनेला समोर ठेवून संशोधन विषयाचे आकलन करून घेणे अत्यावश्यक ठरते.

**मूळशब्द** – लोकशाही, न्यायव्यवस्था, विवेक, सामाजिक धारणा

**विषयप्रवेश –**

"The trial of Socrates was a forgone conclusion. It was one of those events whole outcome precedes its beginning and whose ending inspires its start"[2]- Joseph Heller

'द इकानॉमिस्ट इंटेलिजन्स युनीट' च्या वतीने २०१९ वर्षाकरीता लोकशाही निर्देशंकाची क्रमवारी जाहिर केली. भारत २०१८ मध्ये ४१ व्या स्थानी होता तो आता ५१ व्या स्थानी आला आहे. १६७ देशाच्या क्रमवारीत नार्वे प्रथम स्थानावर असून सर्वात तळाशी उत्तर कोरीया आहे. महत्वाचे म्हणजे पहिल्या १० स्थानात नेहमीप्रमाणे अमेरिका नाही. जगात वयाने मोठी असलेला लोकशाही देश अमेरिका मानला जातो तर भारत लोकसंख्येच्या आधारावर इंग्लडला प्रदिर्घ वारसा असला तरी तो अदयापही राजेशाहीच्या जोखडातून मुक्त झालेला नाही. यामधिल मानके व ती ठरविण्याची पध्दत आधुनिक युगात विकसीत झाली. सॉक्रेटिस च्या काळात अश्या काही रचना असत्या तर त्यांनाही क्रमवारीच्या यादीत पहिल्या स्थानी येता आले नसते, याचे मुख्य कारण म्हणजे मोजमापाच्या पध्दतीत अभिव्यक्तीचा अवकाश, लेखण, विचार, नागरी स्वातंत्र, स्थलांतरण यांचा समावेश आहे. ही निकष तत्कालीन स्थितीतील शासन व्यवस्थाना लागू करून पाहिल्यातर ग्रीस लोकशाहीवादी ठरत नाहीत. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल ओळीने संपलेत किंवा परागंदा होउन विस्थपीत झालेत. विदयमान जगात विस्थापन, संपुष्टात येणे, संपविणे या नित्याच्या दिसतात तरी जगभरातील व्यवस्था स्व:ताला लोकशाहीवादी मानतात. मानक ठरणारी यंत्रणा सुध्दा कुणालाच परिघाच्या बाहेर ठेवणारी नसून तिने सर्वच देशातील मोजमाप घेत स्थाननिश्चीती केली आहे. भारतात नागरी स्वातंष्य मोठया प्रमाणात बाधित झाल्याची मांडणी करून तिचा क्रम घसरल्याचे जाहिर केलेत. भारताची जी स्थिती आहे तीच अमेरिका, ब्राझील, रशिया यांची आहे. त्यामुळेच लोकशाहीच्या अस्तित्वात मानके अस्तित्वात राखणाऱ्या संस्था कश्या .तीशील आहे अथवा त्या धोरणी राजकारणाच्या प्रभावळीत गेलेल्या दिसत असल्याची खात्री होते आवश्यक ठरते. ॲरिस्टाटल असो अथवा गांधी यांना लोकशाहीविषयी ममत्व वाटत असले तरी त्यांनी प्रचलीत लोकशाहीतील धोक्याची सूचना केली होती. गांधीना लोकशाही पाश्चात्य प्रकार वाटत होता. त्यामुळेच 'पाश्चात्य लोकशाही फॅसिसचा सौम्य प्रकार असल्याची टिका त्यांनी केली'[३] (पळशीकर २००४) लोकशाहीच्या नावाखाली धर्म, वंश एकवटून राष्ट्रवादाच्या प्रयोगातून ती हिंसेकडे व मानवी व्यवस्थेच्या अध:पतनाकडे कसे घेउन जाते याचे वर्णन त्यांच्या 'हिंद स्वराज्यात' व 'महायुध्दाचा विनाश' या पुस्तीकेतून व लेखातून प्रतिपादीत झाला आहे. गांधी प्रमाणेच विनोबा लोकशाहीच्या संदर्भात सावध करताना म्हणतात 'लोकशाही नाव धारण करणारी आणि मी सर्वायतन आहे' असे भासविणारी राज्यपध्दती आहे. पण हिंसेवर उभारलेली कोणतीही पध्दती जरी ती डोक्यागणिक मत मोजण्याचे सोंग करीत असली तरी सर्वायतन नव्हे (विनोबा, लोकनिती) लोकशाही व्यवस्था बरेचदा न्यायपूर्ण म्हणजेच सर्वानांच दिलासा देणारी, अभय असणारी आणि सर्वांच्या हक्काबाबत न्याय व्यवहार वाटत तरी लोकशाही सर्वायतन ठरत नाही. सर्वायतन खऱ्या खुऱ्या न्यायाला अभिव्यक्त करीत असल्याचे विनोबा प्रतिपादन करतात त्यांच्या दृष्टिने न्यायात तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. 'हेतू, क्रिया व परिणाम' वस्तुत: आपण न्याय देउ शकत नाही कारण कुणाच्या मनातले हेतू, त्याच्या मनातचे भाव आपण जाणू शकत नाही. दोन्ही पक्षांचे समाधान करणे हे न्यायाजवळ गेल्यासारखे घेइल'.[४] गांधी-विनोबा लोकशाही प्रकराला बाजूला ठेवून सर्वानुमते किंवा सर्वायतन पध्दतीत स्वीकारत असले तरी या व्यवस्थेत बऱ्यापैकी न्यायतत्व अस्तित्वात राहू शकते यावर मात्र विश्वास करतात त्यामुळेच गांधीनी लोकशाही व्यवस्थेची बाजू उचलून धरली. नव्या आधुनिक व्यवस्थेत घटनात्मक पध्दती आल्यानंतर त्यासंदर्भात लिखीत रचनामधून लोकशाहीचा टिकाव देण्याचा प्रयन्त झाला त्यामुळे न्यायाच्या बाबतीत ज्या प्रचलीत धारणा होत्या त्यांना शब्दांच्या चौकटीत बसवून सिध्द करण्यात आल्यात. भारतीय लोकशाहीचा आधार पुरविण्याची जबाबदारी घटनेने न्यायपालिकडे देउन तिच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. राजकीय सत्ताधीश कदाचित अनुनय करण्यापोटी नको त्या घोषणाकरून लोकशाहीच्या गाभ्याला नख लावू शकतील पंरतु न्यायव्यस्थेतील धुरिंनाना अनुनय करण्याची गरज भासणार नसल्याने ते घटनेचा अर्थ व्यवस्थित लावून नागरिक हक्क व लोकशाहीला जिवंत राखण्याचा प्रयत्न करतोच असा संविधानकर्त्याचा होता व तो पूर्णत: चूक आहे असे म्हणता येत नाही. त्यामुळेच राजसत्ताधाऱ्यांनी बरेचदा भारतीय

न्यायव्यवस्था संकुचितवादी बनलेली असून तिने संसदेचा अवकाश व्यापल्याची टिका केली तर माध्यम जगतानी तिला लोकशाहीचा तिसरा स्तंभ म्हणुन गौरविले आणि सामान्य जनतेने तिची निपक्षत:अबाधित असल्याचे कौतुक करीत अदयापही न्याय जिवंत आहे यावर प्रसंगानुरूप शिक्कामोर्तब केलेत. हे सर्व लोकशाही प्रक्रीयेतून घडल्याने सामान्य जनता संविधान व लोकशाही यांची बूज राखताना दिसून येतात. लोकशाहीमध्ये जनतेचे सार्वभौमत्व निर्माण झालेले असले पाहिजे असे जेव्हा रूसो प्रतिपादन करतो. त्यावेळी सार्वभौमत्वाला कायम राखणाऱ्या संस्थाची उभारणी व्हायला हवी हे अभिप्रेत असते. जगभरातील .ती हया न्यायपूर्ण व्यवस्थांसाठी तयार झाल्यात असाव्यात याला मग बळकटी मिळू लागते. मानवी जीवनाचा प्रवास एका अस्वस्थेकडून तर स्थिर समुदायापर्यंत जो झालेला आहे तो लक्षात घेतलातर न्यायपूर्ण संस्थाची निर्माण झालेली गरज स्पष्ट व्हायला लागते. बदलत्या परिस्थितीत लोकशाही प्रमाणेच न्यायव्यस्थेचे संदर्भ बदलेले दिसून येतात.

**न्यायाच्या प्रचलीत परिभाषा –**

सामान्य माणसांनी मोठे होणे, मंत्री, श्रींमत, हुकूमशहा यांच्यावर कायदयाचे नियंत्रण असणे, गुणवत्तेची समीकरणे आकारास येणे ही न्यायाची खूण आहे. वस्तुत: न्याय हा समाजाच्या अस्तित्वाची आणि उदयाच्या भवितव्याची आधारशीला आहे. या अनुषंगातून वर्तमान संदर्भ जोखल्या जातात तेव्हा त्याची महन्नता लक्षात येते. त्याचे महत्व कालातीत असल्याचे पूर्व दाखले तपासले की लक्षात येते. साक्रेटिस म्हणतो 'न्यायालयात केली जाणारी शिक्षा हा नकारात्मक न्याय आहे आणि न्याय ही नकारात्मक संकल्पना नसून ती सकारात्मक व विधायक आहे.'[५] (व्दादशीवार २०१६) सॉक्रेटिसच्या विवेचनातील त्तकालीन न्यायव्यस्थेचे चित्रण येते. त्याच्यावर भरलेल्या खटल्यात ५०० ज्युरी सहभागी होते. त्यातील केवळ २२१ ज्युरींनी साक्रेटिसच्या निर्देषत्वाच्या बाजूने आपला निकाल दिला परंतु ३७९ ज्युरींनी पेरिक्लीस व डोमेस्थेनिस्क यांच्या प्रमाणात येउन प्रतिकूलनिर्णय दिला आणि त्याचा परिणाम महान अशा तत्ववेत्याच्या खुनात झाला. गांधीनी साक्रेटिसला पहिला सत्याग्रही संबोधले आहे. साक्रेटिस सकारात्माक दृष्टिने पाहतांना न्यायाचा विचार एका वेगळया परिप्रेक्ष्यात मांडताना दिसतो 'माझ्यावर अन्याय झाला आहे अथवा होतो आहे असे जोवर एखादयाला वाटते तोवर खऱ्या वा खोटया अन्यायाचा असतो. ही भावना जी निर्माण होते तिला घालविण्याचा मार्ग निर्माण करणे हा न्याय ठरेल'[५] सॉक्रेटिस आपल्या शिष्यांनी दिलेल्या प्रस्तावाला बळी पडला नाही तसेच राज्यकर्त्यांच्या आमिषांना बळी पडला नाही तर धिरोदात्तपणे मृत्युला सामोरा गेला. त्यामुळेच न्यायाची बाजू वा विचार वर्तमान काळातही चर्चेत आहे अन न्याय प्रस्तावनेत ते तत्व पाहिल्या जाताना जेव्हा दिसते तेव्हा न्यायाची निकषे संदर्भातील आहे हे स्पष्ट होते. 'कन्सर्निंग जस्टीस' या ग्रंथात प्लेटो न्यायाच्या बाबतीत चर्चा करतांना त्याची आजच्या काळातील संगती दर्शवितांना दिसतो. 'व्यवहारात आपण न्यायाचा अर्थ त्याच्या कायदेशीर परिणामावरून ठरवित असतो. म्हणजे आपल्या हक्कांचा कुणी आव्हान दिल्यास आपल्या हक्कावर कुणी आक्रमण केल्यास न्यायालयाकडे धाव घेतो व आपल्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन व्हावे अशी अपेक्षा बाळगतो.'[६] तत्कालीन न्याप्रणालीवरील प्लेटोचे भाष्य लक्षात घेतले तर वर्तमान न्यायव्यवस्थेची बीजे पूर्वकालीन राजकीय व्यवस्थेत अस्तित्वात होती हे स्पष्ट होते. मध्ययुगीन कालखंड वगळण्यात न्यायाच्या बाबतीत विकसीत झालेल्या संस्था पूर्वेरूपाने जीवंत होत्या या विचारांना बळकटी मिळते. पुढे जाउन न्यायाचा विचार विस्तारतांना प्रत्येक व्यक्तीला तिच्या गुणवत्तेनुसार स्थान प्राप्त व्हायला हवे अशी अपेक्षा व्यक्त करतो. सॉक्रेटिसचा बळी हा गुणवत्तेचा बळी होता व तो झुंडीतील बहुसंख्याकवादातून आलेला होता हे लक्षात आणून देतो. त्यामुळे न्यायव्यवस्था गुणीजन अन बुध्दीमान, विवेकवादी व्यक्तीच्याकडे का असावी या बाबतची शंका दूर करायला मदत करते.

**संदर्भाची पडताळणी –**

भारतीय संविधानाचा भाग पाच मध्ये आणि प्रकरण चार अतंर्गत संघ न्याययंत्रनेबाबत निर्देश दिलेले आहेत. अनुच्छेद १२४ ते १४७ यामध्ये न्याययंत्राचे अधिकार स्पष्ट आहेत. 'घटनाकर्त्यांनी अनुच्छेद ३२ व २२६ अन्वये न्यायीक पूर्वविलोकनाचा अधिकार न्यायालयाला प्रदान केला आहे व कायदयाचा अर्थ स्पष्ट करण्याची जबाबदारी सोपवून सामान्य जनतेच्या हितसंदर्भात न्यायपालिका सर्वोच्च आहे असे सुस्पष्ट केलेत'[७] भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारामधील स्वातंष्याच्या अधिकारालाअपवाद मूळ घटनेत नव्हते. १९५१ मध्ये रमेश थापरविरूध्द मद्रास राज्य हा खटला उभा झाला त्यातून आलेल्या निर्देशातून संसदेने पहिली घटना दुरूस्ती करून अपवाद सामाविष्ठ केलेत. १९६७ मध्ये गोलकनाथ केस खटल्यात संसदेला मूलभुत अधिकार बाधित करण्याचा अधिकार नाही असे स्पष्ट करून न्यायपालीकेने आपली सक्रीयता दाखवून दिली तेव्हा पासून तर आजतागायत कायदेमंडळ आणि न्यायपालीका यांच्यातील संघर्ष कायम असून दोन्ही मंडळे संधीचा उपयोग करून आपली प्रतिमा सिध्द करताना दिसतात. १९७३ मध्ये केशवानंद भारती खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने सहा न्यायाधिशांच्या खंडपिठातील पाच न्यायाधिशाने आपले निकालपत्र संसदेला मुलभूत अधिकार परिस्थितीजन्य स्थितीत स्थगीत करता येतें असा निर्णय दिला परंतु संविधानाच्या मुलभूत रचनेला धक्का लावता येणार नाही असे स्पष्ट केले. पुढे जाउन हाच वारसा व न्या.कृष्णा अय्यर यांनी विस्तारीत केला. एका महत्वपूर्ण स्वरूपात निर्णय देताना न्यायमूर्ती एच. आर. खन्ना म्हणाले 'स्वातंत्र्य हे घटनानिर्मीती आणि मानवाधिकार निर्मीतीच्या पूर्वीचे आहे' त्यामुळे स्वातंत्र्य शाबूत राखणे हे निसर्गन्याय तत्व ठरते. न्या. .ष्णा अय्यर यांनी १९८० मध्ये माणसांच्या मूलभूत गरजात आरोग्य व शिक्षण याची अनिवार्यता आहे हे स्पष्ट करून नागरिकांच्या सामाजिक आणि

व्यक्ती विकासाच्या दर्जाला प्रतिष्ठीत केले. विशाखा खटला, भवरीदेवी प्रकरण, सतीचा प्रश्न, तीन तलाक, शबरीमला, एनआरसी, राममंदीर निकाल, आधारकार्डची सक्ती, समलींगी विवाह या अलिकडे प्रस्थापित झालेल्या निकालांनी विधीमंडळाच्या मर्यादा जशा उजागर झाल्यात त्याचप्रमाणे न्याय व्यवस्थेने आजपर्यंत जपलेली प्रतिमा उजाळून निघाली. राजकीय वर्गाचा निर्णय नेहमीच वादग्रस्त, तणाव निर्माण करणारा आणि आंदोलनाच्या रूपातून अभिव्यक्त होत तो निवडणुकांच्या आखाडयापर्यंत पोहोचणारा दिसून आला. परंतु त्या तुलनेत न्यायालयीन निर्णयांना सर्वच वर्ग, पंथ, धर्म यांनी उचलून धरत कुठलेच बखेडे उमटवू दिले नाहीत. आसाममधील एनआरसी, तीन तलाक, राममंदीर ही अलीकडची उदाहरणे होत.उलट सीएएचा निर्णय तसेच जम्मू-काश्मिरच्या संदर्भातील निर्णय राजकीय धग पेटविण्यास कारणीभूत ठरलेत. याचा अर्थच जरी न्यायव्यवस्था सक्रीय झालेली असली तरी घटनाकारांनी व्यक्त केलेली अपेक्षा पूर्ण करण्यात सहाय्यभूत ठरली आहे. ९ नोव्हेंबर २०१९ ला सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय राममंदीराच्या बाबतीत आला. १९४८ पासून प्रलंबित वाद राज्यव्यवस्थेला सोडविता आला नाही. उलट देशातील स्थिती विवादास्पद बनविण्यात राजकीय पक्ष यशस्वी ठरलेत. न्यायपालीकेने मात्र धाडस दाखीवत घेतलेला निर्णय सर्वच घटकांना न्याय झाल्याची भावना दर्शविणारा होता. अत्यंत शांततेने अन् संयमाने विवादीत पक्षकारांनी निर्णयाला स्विकारले न्यायव्यवस्था राज्यव्यवस्थेला जे शक्य नाही त्याचा तोडगा देउ शकते हे सिध्द झाल्याने तिच्या सक्रीयतेच्या विरोधातील ओरड मात्र क्षीण झाली. गेल्या सात दशकातील तिची वाटचाल लक्षात घेतली तर येथील विविधतेला कवेत घेत कुठलाही दर्प न दाखविता दिलेले निर्णय ऐतिहासीक पठडीत मोडले जातात. घटनेतील ९ व्या परिशिष्ठाला हात घालण्याची तिची मर्यादा कायदे मंडळाने निर्माण केलेली असली तरी मिळालेला अवकाश शाबूत राखत लोकशाहीव्यवस्थेला दृढ करण्याचा तिचा प्रयत्न अनेक आरोप-प्रत्यारोपांनतर प्रशंसनिय मानला जातो.

**संदर्भाच्या पलीकडील मूक्त चिंतन –**

संविधानीक व्यवस्था नागरिक हक्कांना, देशाला सुरक्षित राखण्याचे दायित्व पूर्ण करते. तद्वतचअनेक विवांदाना कायदयाच्या चौकोटीत सोडविण्याचा प्रयत्न करते. विशेषत: लोकशाही देशामध्ये कायदा हा सर्वांसाठी समान मानल्या जातो असे मात्र म्हटल्या जात असले तरी अशी वस्तुस्थती कुठे आढळताना दिसत नाही. एका बाजूला अनेक ऐतिहासीक न्यायनिवाडे तिच्यावरील विश्वासाची खात्री देतात. त्याचवेळी कुठेतरी चिन्हांकीत होताना दिसून येते. ही स्थिती केवळ भारताची नसून ती वैश्विक आहे. हॉवर्ड विश्वविदयापीठाततील भूतपूर्व डीन डॅरेक सी बोनू यांचे वक्तव्य या संदर्भात विचारप्रवृत्त आहे. 'ऐसे असंख्य कानून है, जो विशिष्ठ जनो तथा बडी-बडी कंपनीयो पर लागू होते है, ये कानून अत्यंत बारिक होते है (कमकपबंजम) इन्हे लागू करने मे बहूत से योग्य व्यक्ती साथ देते है' समाज के इस क्षेत्र मे जीवन निर्वाह की किमंत की तुलना मे कानूनी सेवाओकी किमत तेजी से बढती है। सिध्दांतता देश के सभी नागरिक न्यायालयो के समक्ष बराबर होते है। किंतु व्यवहार मे ऐसा नही होता है समाज को जो वर्ग कानूनी सेंवाओ का खर्च वहन करने मे असमर्थ है, उसके मौलिक अधिकारोंकी हमेशा बली दी जाती है और उसे हर स्थिती के साथ समझोता करना पडता है'८भारतात न्यायव्यवस्था महागडी आहे असे जेव्हा म्हणतो तेव्हा सामान्य माणसे न्यायापासून वंचित राहतात हे तथ्य उदयास येते. न्यायपालिकेने स्वत:हून दाखल करून घेतलेले खटले किंवा संसदेच्या निर्णयाला आव्हाण म्हणून आलेले खटले याबाबतच न्यायपालीका जेव्हा निर्णय देते, त्यावेळी त्यात सामाजिकता कितपत असेल असा प्रश्न उद्भवतो. घटनेतील १४ वे कलम कायदयाची समता मांडत असली तरी सर्वसामान्य माणसांना न्याय प्राप्तीसाठी अविरत संघर्ष करावा लागतो वा त्यानां ती फी परवडणारी नसते. त्यातूनच 'शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये' अशी म्हण तयार झाली. त्याचवेळी न्यायाधिशांचा वैयक्तीक प्रभाव, त्याचेही संबंध यावर बरेचदा प्रश्न उठलेले आहेत. अलीकडे शबरीमलाच्या निर्णयावर पुर्नविचार करणे, काश्मिर व सीएए बाबत स्थगितीस दिलेला नकार हे निर्णय समावेशक निर्णयात मोडताना दिसत नाही. एक तर मोठा वर्ग न्यायापासून बराच लांब राहतो किंवा काही प्रश्नाबाबतचे संशय दूर करण्यास न्यायव्यवस्था अपुरी पडलेली आहे. महाराष्ट्रातील सत्तास्थापनेच्या पेचामध्ये दाखविलेली सक्रीयता अन्य प्रश्नामध्ये दिसत नाही तेव्हा जनमाणस परिपूर्ण विश्वासापासून लांब राहताना दिसतो. निर्भयाच्या प्रकरणात ही बाब प्रकर्षाने पूढे आलेली आहे. त्याचप्रमाणे मुख्य न्यायाधिश निवड प्रक्रीया आणि विवादास्पद वाटणारे न्यायाधिश याबाबतचे संकेत निपक्षता दर्शविणारे राहिलेले नाही. १९९६ मधील न्या. अहमदी यांच्यासंदर्भात उभा झालेला प्रश्न असो अथवा २०११ मधील न्या. मिश्रा यांच्याबाबत व २०१९ मधील न्या. रंजन गोगोई यांच्या बाबतचे प्रश्न तसेच घटनेची ९९ वी दुरूस्ती रद्द करण्याचा प्रश्न, १२ जानेवारी २०१८ मध्ये न्या. चलमेश्वर व तीन न्यायाधिशांनी पत्रकार परिषद घेउन येथील न्यायव्यवस्थेत सर्वच सुरळीत सुरू आहे हे यावर भलेमोठे प्रश्नचिन्ह लावणारे व त्यातील अतंर्गत वादळ दाखविणारे राहिलेत. या सर्व बाबीचा विचार करता विवेकवादी वर्गाला न्यायपालीकेची सक्रीयता जिव्हाळयाची खरोखर आहे का की केवळ तो आपल्या घटनात्मक कर्तव्याचा भाग आहे असा प्रश्न पडतो. मुळातूनच व्यक्ती या प्रक्रीया चालवित असल्याने व केंद्रीय - राज्यीय सत्ताचा प्रभाव टाळल्या जाउ शकत नसल्याने न्यायव्यवस्था आजही साक्रेटिस कालीन प्रभावातून परिपूर्ण मुक्त झालेल्या आहेत असे म्हणता येत नाही. धर्म, जात, पंथ, भाषा, पक्ष वातावरण यांचा प्रभाव कायम आहे. राजकीय पक्षांव्दारा घेत असलेला निधि तपासता येणार नाही असे जेव्हा भाष्य न्यायव्यवस्था करते तेव्हा त्यात आंतरिक संबंध किती गुंतलेले आहेत हे जाणवू लागते त्यामुळे अंतमुर्ख होउन त्यावरील चिंतन करण्याची गरज भासते.

**मुल्यांकन –**

अभिनव चंद्रचूड यांनी 'द इनफार्मल कॅन्स्टिटयुशन अनरिटन क्रायटेरिया इन सिलेक्टींग जजेस फॉर द सुप्रिम कोर्ट ऑफ इंडिया' या पुस्तकात १९५० ते २००९ या कालावधीत १८९ न्यायाधिशांच्या झालेल्या नियुक्त्यांचा शास्त्र शुध्द अभ्यास करून अत्यंत महत्वाची रंजक निस्पुर्ष मांडली आहे. न्यायव्यवस्थेत सुध्दा घराणेशाही आहे त्यामुळे राजकीय वर्गावर आसूड ओढणे चुकीचे असल्याचे म्हणावे लागते. उच्च-सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहचण्याचामार्ग अत्यंत खडतर आहे. त्यामुळे वारसा नसणारी अत्यंत हूशार, प्रतिभावंत व्यक्ती पोहचतील याची खात्री नाही, जे पोहचलेत ते अपवाद आहेत. जिथे न्यायव्यवस्था विशिष्ठ परिवारांच्या हातात एकवटली असेल व राज्यकर्त्यांचे त्यांना छत्र लाभत असेल तर न्यायव्यवस्थेकडून लोकशाही व्यवस्था जगविण्याची हमी मिळू शकेल काय हा लाखमोलाचा प्रश्न चर्चेत आहे. घटनेचे ९९ वे विशोधन रद्द ठरविण्यामागील वस्तुस्थिती मग लक्षात येउ लागते. कॉलेजियमचा परिघ मर्यादित करून पूर्वीचेनाव कायम राखण्याची भावना परिवारवादाला भक्कम करण्याच्या दृष्टीने सूचित करणारी आहे. भारतीय संविधनसभेतील न्यायपालीकेची अधिकार क्षेत्रे व रचना याबाबतच्या चर्चेत डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी सुस्पष्टपणे आपले मत मांडताना स्पष्ट केलेत 'सरन्यायाधिशाच्या मतालाबंधनकारक मानणे याचा अर्थ असा आहे की, सरन्यायाधिश या व्यक्तीच्या नि:स्पृहतेवर व त्याच्या निर्णयाच्या योग्यतेवर अढळ विश्वास दाखविणे. व्यक्तीश: मला सरन्यायाधिश या व्यक्तीच्या श्रेष्ठत्याविषयी कुठलीच शंका नाही. पण सरतेशेवटी सरन्यायाधिश हाही तुमच्या माझ्यासारखाच हाडामासाचा माणूस आहे. त्यालाही मानवी मर्यादा आहेत. माणूस म्हणून असणारे राग, लोभ, पूर्वग्रह, भावना यापासून तो मूक्त नाही. एकटया सरन्यायाधिशाला सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिश निवडीमध्ये नकाराधिकार देणे म्हणजे त्या व्यक्तीच्या हातात तो अधिकार देणे आहे, जो आपण राष्ट्रपती वा केंद्र सरकार यांच्याकडे देउ इच्छित नाही. अशा प्रकारचा प्रस्ताव माझ्या दृष्टीने अतिशय धोकादायक आहे.' (संविधान सभेतील भाषण खंड ८, पृ.क्रं. २५८). डॉ. आंबेडकराच्या दुरदर्शित्वाचा हा एक नमुना होय. ज्या न्यायव्यवस्थेवर विश्वास दर्शवित तिला संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सोपविली तिची सुत्रे सरन्यायाधिश व्यक्तीत्वाच्या विचारावर, त्यांच्या ठेवणीवर फिरत असेल तर भविष्यातील चित्र आशादायी राहू शकत नाही. १९९६ ते २०१९ या कालावधीतील काही सरन्यायाधिशावर संशय व्यक्त झाला त्यावेळी 'रोस्टर ऑफ मास्टर' सरन्यायाधिशच राहतात हे सांगून स्वत:वरील खटले प्रत्यक्षात त्यांच्या समोरच आलीत व ते निर्णयात सहभागी राहिलेत. याचाच अर्थ पक्षपात विरहीत तत्वज्ञान प्रसूत करण्यात मग ते कमी पडतात हे सिध्द होउ लागते. शामिडहासर यांचे निरीक्षण अश्या संदर्भातविचाराधिन दिसून येते. 'न्यायाधिश न्याय की कुर्सी सभांलने के बाद अपने व्यक्तीगत विचारोंको छोड देता है ऐसे माना जाता है. पर वह पूर्ण सत्य नही है, वह केवल भावना के अवचेतन प्रभाव को (sub-Conscious) नियीमत करता है. जिसका स्वंय को पता भी नही चलता.' परिस्थीती, वातावरण, सामाजिक स्थान, घेतलेले शिक्षण, शिक्षणसंस्था यांचाही प्रभाव व परिणाम निर्णयांवर असतो. डॉ. गॉडबोएस यांनी १९६९-७६ या दरम्यान नियुक्त न्यायाधिशामधील ३१ न्यायाधिशांनी विदेशातून शिक्षण घेतलेले होते असे अभ्यासातून मांडलेले आहे. त्यामुळे न्यायाधिशाचा निर्णय जी संवैधानीक व्यवस्था स्विकारून येथील परिघाबाहेरील उपेक्षित, वंचित, अल्पसंख्याक मग ते कुठल्याही स्तरावरील का असेना त्यांच्या संरक्षणार्थ आणि उद्भवणाऱ्या वादाबाबत कसे व कोणते निर्णय देतात यावर अस्त्विाचे भवितव्य अवलंबून आहे. संविधानीक चौकटीतून येणारे तत्व लक्षात घ्यावयाचे की विकसीत झालेले संकेत घेउन न्यायव्यवस्थेतील नियुक्त्या करावयाचा हा चर्चेचा प्रश्न आहे. अभिनव चंद्रचूड यांनी विकसीत झालेल्या महत्वाच्या तीन संकेताकडे लक्ष वेधलेले आहे. 'एक सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती होण्याकरीता सरासरी वय ५५ वर्षे आहे. दोन किमान २० वर्षे उच्च न्यायालयात न्यायाधिश अथवा मुख्य न्यायाधिश असावी. तीन सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती करताना प्रादेशिक समतोल राखल्या जावा'९ हे तिन्ही संविधानाचा भाग नाही. असे असताना निवडीत या निकषांना मिळालेले स्थान चौकटीतील नसताना नियुक्ती व निर्णय दोन्ही कायदा व नैतिकतेच्या पातळीवर योग्य मानता येइल काय? असे जर वास्तव असेल तर ज्या न्यायवृंदानी सॉक्रेटिसचा बळी घेतला त्या व्यवस्थेत बदलत्या जगतात व भवतालात नेमके कुठले परिवर्तन आलेत, तीची सक्रीयता खरोखरच घटनात्मक आहे काय? आणि अंतिमत: तिने आकारास आणलेले संदर्भ व त्यापोटी पोटतिडकीने होणारे चिंतन कितपत प्रस्तुत ठरून लोकशाही व्यवस्थेला शाबूत राखण्यास उपयुक्त कारक ठरते याचा वेध होणे अत्यावयश्यक ठरते.

**संदर्भ**

१) सत्याग्रही सॉक्रेटिसचे विरमरण, वसंत पळशीकर, अक्षर मुद्रा प्रकाशन, पुणे १९९६, पृ. क्रं. ७७
२) कित्ता पृ. क्रं. १
३) भारतीय लोकशाही अर्थ व व्यवहार, संपादक राजेन्द्र व्होरा, सुहास पळशीकर, डायमंड पब्लीकेशनूस पुणे, २००४, पृ.क्र. १४
४) विनोबा, लोकनिती, परंधाम प्रकाशन पवनार, २००९, पृ.क्र. १०५
५) युंगातर मन्वतंराचा उत्तरार्ध, सुरेश व्दादशीवार, साधना प्रकाशन पुणे २०१६, पृ.क्रं. ५४
६) पाश्चात्य विचारवंत, डॉ. विजय देव, गोसावी, आपटे, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २०१२, पृ.क्रं.२९
७) भारताचे संविधान, भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय दिल्ली, २०१४, पृ. क्रं. ४३-५०
८) भारत मे विधी व्यवस्था, नरेंद्रलाल मदान, हिंदी माध्यम कार्यान्वय निर्देशालय, दिल्ली, १९८८, पृ.क्रं.४०-४१
९) अदृश्य लिपीतील संकेताचे भाषांतर, प्रतापसिंह सांळूके, साधना अंक, २६ मे २०१८, पुणे, पृ.क्रं. २०